## प्रकरण पहिले

### ।। ललित गद्याची पार्श्वभूमी व स्वरुप विवेचन ।।

## प्रकरण पहिले

## ।। ललित गद्याची पार्श्वभूमी व स्वरूप विवेचन ।।

### प्रास्ताविक :-

प्रस्तुत लघु-प्रबंधात आपण "अनिल अवचट यांच्या ललित गद्य लेखनाची वैशिष्ट्ये" त्यांच्या "माणसं" व "धागे आडवे उभे" या दोन पुस्तकांच्या आधारे पहाणार आहोत.

1 "ललित गद्य" हा ललित वाङ्मयातील कथा, कादंबरी, नाटक, कविता यांच्यासारखाच एक वैशिष्टयपूर्ण वाङ्मय प्रकार आहे. प्रसिध्द समीक्षक "रेने व्रेलेक आणि ऑस्टिन वॉरेन यांनी साहित्य सिध्दान्त (Theory of Literature) मध्ये ललित वाङ्मयाचे (साहित्याचे) मूलभूत प्रकार गद्य, पद्य आणि नाट्य हे मानले आहेत. ललित गद्य हा गद्यांतर्गत साहित्य प्रकार आहे. या गद्याचे स्वरूप सर्वसमावेशक आहे. आजवर अनेक समीक्षकांनी या ललित गद्याचे तंत्र आणि मंत्र, त्याची विविध प्रयोजने यांची विविध स्वरूपात चर्चा केली आहे. वाङ्मयाचा वाचक, समीक्षक, लेखक हे वाङ्मयप्रकाराचे भान ठेवूनच आपले वाचन, समीक्षण नि लेखन करत असतात, म्हणून साहित्यात "वाङ्मयप्रकार" म्हणून व्यवस्था करणे आवश्यक आहे, स्थूलपणे एक चौकट असणे जरूरीचे आहे. तशी ती प्रत्येक वाङ्मयप्रकारात असतेच.

### प्रयोजन :-

"ललित गद्य" या वाङ्मयप्रकारात परंपरागत पार्श्वभूमी, स्थूल, चौकट कशी आहे ? "ललित गद्य" नेमके कोणत्या काळात निर्माण झाले ? त्याच्या निर्मितीची कारणे कोणती होती ? त्याच्या विकासाची वाट कोणती आहे ? हा आढावा घेऊन अनिल अवचट यांचे लेखन सकृद्दर्शनी "ललित गद्य" वाटते, परंतु त्यांच्या लेखनाची

खास अशी काही वेगळी वैशिष्ट्ये आहेत का ? याचा शोध आपण प्रस्तुत ठिकाणी घेणार आहोत.

अनिल अवचटांच्या "ललित गद्य" लेखनाची वैशिष्ट्ये शोधताना "ललित गद्याची" पार्श्वभूमी पहाणे अगत्याचे आहे.

## ललित गद्य : विविध मते, स्वरूप व विकास :-

"ललित गद्य" हा शब्द प्रयोग ज्या अर्थाने आज आपणांस अभिप्रेत आहे त्या अर्थाने तो १९५० नंतर रूढ झाला. आधुनिक मराठी साहित्याने जेव्हा नवसाहित्याचे वळण घेतले तेव्हा तो आजच्या रूढार्थाने (म्हणजे लघुनिबंध, ललित निबंध, व्यक्तिचित्र, आठवणी, अनुभव, प्रवासवर्णन, पत्रे, रिपोर्टाज इत्यादींचा समावेश असलेला) वापरला जाऊ लागला.

या सर्वसमावेशक "ललित गद्याचा" विचार करताना आपल्याला लघुनिबंधाच्या स्वरूपाकडे, त्याच्या मूलभूत वैशिष्टयांसाठी जावे लागेल. कारण, ती वैशिष्टये कमी अधिक प्रमाणात ललित गद्याला व्यापून राहिली आहेत. लघुनिबंधाचे विकसित रूप म्हणजेच "ललित गद्य" होय.

१९२६पासून मराठीत "लघुनिबंध" अवतरला. ही वस्तुस्थिती अनेक विचारवंतांप्रमाणेच मान्य करून डॉ. भीमराव कुलकर्णी "अव्वल इंग्रजी कालखंडातील निबंध लेखन हे लालित्यपूर्ण होते" असे प्रतिपादन करून "भाऊ महाजनांनी लिहिलेल्या "धूमकेतू" मधील दि. ३१ मार्च १८५४ च्या अंकातील "आनंदनाम संवत्सराचे वार्षिक वर्षफल" या लेखाचा विचार हा लघुनिबंध म्हणून करावा लागेल असे सुचवतात, त्या बरोबर आगरकर, शि. म. परांजपे यांच्या निबंधातील काव्यमयतेबरोबर डोकावणारी नितांत आत्मनिष्ठा ही "ललित गद्याची" वैशिष्ट्ये आपण दुर्लक्षू शकत नाही, तर १८५४ पासूनच हलके फुलके, गंमतीने लिहिण्याची परंपरा मराठीत दिसून येते."[१]

मराठी लघुनिबंधाला १९२७ पूर्व मराठी वाङ्मयीन पार्श्वभूमी कारणीभूत आहेच, त्याबरोबर नीटस आकार यायला इंग्रजीतील "पर्सनल एसे" हाही कारणीभूत आहे.

इंग्रजी निबंध हा मराठी निबंधापेक्षा १०० वर्षे अगोदरचा आहे· इंग्रजी भाषा वाड्मयाच्या अभ्यासानेच "लघुनिबंध" हा वाड्मयप्रकार आपल्या ओळखीचा झाला आहे· इंग्रजीतील "पर्सनल एसे" फ्रेंचमधील "एसाय" मधून निर्माण झालेला आहे ·

"मौंतेन" §इ·स· १५३३ ते १५९२ § या फ्रेंच लेखकाने इ·स· १५८०मध्ये आपली दोन पुस्तके प्रसिध्द करून "एसाय" § Essai § हा प्रकार फ्रेंच भाषेत रुढ केला म्हणून मौंतेन हा लघुनिबंधाचा प्रवर्तक होय· या मौंतेनचे लेखन लहान स्वरूपाचे, मुक्तपणाचे आहे, स्वतःला स्वतःच रेखाटण्याचा या प्रकारात प्रयत्न आहे असे सांगताना मौंतेन म्हणतो·, "I am myself the subject of my book." §माझ्या लेखनाचा विषय मीच आहे·§ लेखनाचा विषय जर "मी" असेल तर "मी" च्या विविध रूपावर लिहिले जाणे अगदी स्वाभाविक आहे·

"फ्रॉन्सिस बेकन" §इ·स· १५६१ ते १६२६ § हा मौंतेनचा समकालीन· बेकनने मौंतेनचा लघुनिबंध इंग्रजीत आणताना त्याचे मूळचे मोकळे स्वरूप बदलून त्याला वैचारिक, तार्किक असे स्वरूप दिले· बेकन स्वतः एक तत्त्वज्ञ आणि न्यायाधीश होता· त्यामुळे त्याच्या लेखनाचे स्वरूप ही तत्त्वज्ञ व्यक्तित्वासारखेच. विचार आणि अनुभवदर्शन यांना सारखेच स्थान असलेला मौंतेनचा "एसाय" बेकरने विचारनिष्ठ नि गोळीबध्द करून इंग्रजीत "एसे"(Essay) या नावाने आणला· त्यामुळे विचारांच्या दृष्टीने अधिक वस्तुनिष्ठ, गंभीर, थंड, काहीसा अलिप्त प्रवृत्तीचा हा निबंध झाला· वैयक्तिक अनुभव सांगण्यापेक्षा अनुभवातील वैचारिक परिपाक त्याने "एसे" मधून मांडला· त्यामुळे मौंतेनच्या "एसाय"मध्ये अनुभवदर्शनाच्या अंगाने व्यक्त होणा-या मनःस्थितीला व डोकावणा-या व्यक्ति-वैशिष्ट्यांना "एसे" मधून बाजूला सारले गेले· "एसे" म्हणजे विचारांची संक्षिप्त टिपणेच झाली· फ्रेंचमधून इंग्रजीत येतानाच हा "एसे" वेगळे रूप धारण करून जन्माला आला·

इ·स· १६६८ मध्ये अब्राहम काउले, डॅनिअल डिफो या उल्लेखनीय निबंधकारांनी मौंतेनच्या "एसाय"मधील व्यक्तित्वासह, व्यक्तिनिष्ठ प्रवृत्तींसह हा निबंध इंग्रजीत आणला·

अशा या दोन प्रवाहांनी ﴾मॉंतेन-काउले-डीफो व दुसरा बेकन﴿ इंग्रजी "एसे" अनेक अंगांनी विकास पावू लागला·

बेकन पध्दतीचा प्रवाह विचारनिष्ठेच्या दिशेने वाटचाल करत, विकास पावत गेला आणि काउले पध्दतीचा प्रवाह "पर्सनल एसे" (Personal Essay) म्हणजे अनुभवांना प्राधान्य देण्याच्या दिशेने वाटचाल करत, विकास पावत गेला·

या दुस-या आत्मनिष्ठ निबंधाच्या (Personal Essay) प्रवाहाच्या प्रवासात अनेक टप्पे आहेत· १८ व्या शतकातील स्टील-ॲडिसनचा "पिरिऑडिकल एसे", १९ व्या शतकाच्या आरंभ काळातील "पर्सनल एसे" हा दुसरा महत्त्वाचा टप्पा की ज्याचे श्रेय चार्लस लॅम्बला द्यावे लागते· लॅम्बचा "पर्सनल एसे" पुढे स्वतंत्रपणे विकसित झाला इतका की त्याचे नि एसेचे संबंध, हेतू बदलून गेले· "एसे" वैचारिक वाङ्‌मयाचा भाग झाला तर "पर्सनल एसे" "मी"त्वाच्या आविष्कारामुळे ललित वाङ्‌मयात येऊन दाखल झाला·

याच काळात "मराठी लघुनिबंध" स्वतःचे रूप आकारीत होता, शोधीत होता, बेकनच्या निबंधाची मराठीत भाषांतरे झाली नि त्या धर्तीवरचे निबंध लिहिले जाऊ लागले· लॅम्बचा "पर्सनल एसे" ﴾आत्मनिष्ठ निबंध﴿ फडक्यांनी ( १९२६ ते १९३१ ) "गुजगोष्ट" कंसात निबंधात्मक तर १९२७ ला खांडेकरांनी लघुलेख या नावाने "लघुनिबंध" स्वरूपात मराठी वाङ्‌मयात आणला·

निबंध-लघुनिबंध असा ललित गद्याच्या निर्मितीचा प्रवास पाहिल्यानंतर या साहित्यप्रकाराविषयी विविध विचारवंतांनी मांडलेली मते पाहू नि विकासाचे विवेचन करू·

## विचारवंतांची विविध मते :-

मॉंतेन :- "I am myself the subject of my book."[२]

डॉ·जॉन्सन :- "An Essay is a loose sally of the mind, an irregular, undigested piece, not a regular and orderly performance."[३]

व्हर्जिनिया वुल्फ निबंधाबद्दल म्हणते,..."निबंधाने पहिल्या शब्दापासूनच वाचकाला मुग्ध करायला हवे आणि शेवटचा शब्द वाचला की त्याला प्रसन्न, टवटवीत करायला हवे. दरम्यान निबंध वाचताना त्याला मनोरंजन, आश्चर्य, उत्कंठा, क्रोध इत्यादींचा अनुभव, वेगवेगळ्या परींचा अनुभव आला पाहिजे. कधी कल्पनेच्या उंच भरारीवर तो आरूढ झाला पाहिजे तर कधी विद्वत्तेच्या बौध्दिकतेच्या गहि-या खोल तळाशी तो बुडाला पाहिजे."[४]

**प्रा.ना.सी.फडके** – "....या निबंधाला काव्यमय उद्गाराची उपमा साजण्यासारखी आहे व ज्याप्रमाणे काव्योद्गार जितका सहज, तितका सुंदर, त्या प्रमाणे निबंधही जितका विस्कळीत व सहज असेल तितकी त्याची मनोज्ञता वाढेल, ताजेपणा आणि मुग्धपणा हे ललित निबंधाचे प्राणभूत गुण आहेत आणि रचनेच्या खटाटोपाने त्याला शोभा येण्याऐवजी त्याचा मुग्धपणा व टवटवी मात्र नष्ट होईल."[५]

**प्रा.ना.सी.फडके** - "निबंधाची आधुनिक कल्पना अशी की तो लिहिताना लेखकाने पदोपदी प्रगट झालं पाहिजे. स्वत:विषयी कलात्मक रीतीने दुस-याला जे जे म्हणून सांगता येत असेल ते लेखकानं निबंधात लिहावं अशी परवानगी आहे.....आधुनिक लघुनिबंध हा पुष्कळ अंशी संभाषणाच्या स्वरूपाचा असून सहजभाव हा त्याचा आत्मा आहे."[६]

**वि.स.खांडेकर** "पारिजात" च्या प्रस्तावनेत म्हणतात, "....गंमतीचे विचार हा लघुनिबंधाचा मी प्राण समजतो. एखादी घटना पाहिली की तिच्यातील गंमत आधी माझ्या लक्षात येते. गंमतीचे विचार सुचू लागतात. एखादी घटना पाहून गंभीर विचार सुचू लागले, तर त्याचे रूपांतर निबंधात किंवा प्रबंधात होईल आणि गंमतीचे विचार सुचू लागले तर लघुनिबंधात होईल...एखादा

मध्यवर्ती गंमतीचा चमत्कृतिपूर्ण विचार सुचला की त्याची मांडणी आकर्षक, कलापूर्ण मनोरंजक कशी करता येईल याचा विचार माझ्या मनात सुरू होतो."[७]

वि.स.खांडेकर - "लघुनिबंध" हा वाङ्मयप्रकार मराठी साहित्यात कसा आला त्याबद्दल लिहितात- "विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात गार्डिनर सारख्या नवीन पध्दतीने लिहिणा-या इंग्रजी लेखकांचा झालेला समावेश. मराठी लेखक वर्गाला तत्पूर्वी परिचित असलेल्या इंग्रजी निबंधाहून गार्डिनरचे निबंध सर्वस्वी भिन्न होते. नव्या निबंधकाराला कुठलाही विषय चालतो. टोपी ठेवायला एखादी खुंटी लागते त्या प्रमाणे आपले व्यक्तित्व प्रगट करण्याकरिता निबंधकाराला कुठला तरी विषय घ्यावा लागतो इतकेच त्याचे महत्व असते. हे गार्डिनर, ल्युकास, लिंडल अन्य निबंधकार यांच्यावरून सहज दिसून येण्याजोगे होते."[८]

वि.स.खांडेकर - "पांढरी शिडे" च्या (१९५७) प्रस्तावनेत लिहितात, "फडक्यांच्या गुजगोष्टींचा उगम जसा त्यांच्या सौंदर्यनिष्ठ वृत्तीत होता तसाच तो त्या काळाच्या वाङ्मयविषयक परिस्थितीतही होता. "रत्नाकर" या तत्कालीन अग्रगण्य मासिकाचे फडके संपादक होते. त्या मासिकांतून रसिकांना वाङ्मयाच्या नव्या नव्या परी सादर करणे त्यांना आवश्यक होते. त्याच वेळी इंग्रजीतला आत्मनिष्ठ प्रकारचा निबंध (Personal Essay) गार्डिनर, लिंड, ल्यूकास, चेस्टर्टन वगैरेंच्या वाङ्मयाद्वारे आपल्याकडे परिचित होऊ लागला होता. तत्कालीन विद्यार्थ्यांकडून गार्डिनरची पुस्तके अभ्यासली जात होती. लिंड, चेस्टर्टन, बेलॉक इत्यादींच्या निवडक लघुनिबंधाचे एक पुस्तक त्या वेळच्या इंटरच्या अभ्यासक्रमात पाहिलेले मला आठवते. हा नवा आत्मपर निबंध आकाराने लहान आणि वाचनाच्या दृष्टीने चटकदार होता. जुन्या निबंधापेक्षा तो स्वभावतःच अधिक रंजक व कथेशी जवळचे नाते असलेला होता."[९]

**प्रा·डॉ·भीमराव कुलकर्णी** - "ललित गद्य" हे लघुनिबंध, ललित निबंध, प्रसंगाचित्रे , व्यक्तिचित्रे, भावचित्रे, प्रवास वर्णने, विनोदी लेखन, आत्मनिष्ठापर वैचारिक लेखन इत्यादी प्रकारांना सामावून घेणारे वाङ·मयाचे "शिराळपोटी मायपोट"च ठरलं आहे·

सर्व प्रकारच्या लेखनात सांगण्याच्या पध्दतीला असाधारण महत्त्व प्राप्त होत आहे· सांगणा-यांच्या व्यक्तिमत्त्वाचे ढंग त्या मध्ये मिसळले जात आहेत हे सांगणे सुध्दा असंख्य भूमिकांवरून, निरनिराळ्या पध्दतीने आविष्कृत होत आहे· याचाच अर्थ असा की वाङ्मयातील "लालित्य" ही शक्ती आज बहुतेक लेखनातून मराठी वाङ्मय समृध्द करीत आहे·"[१०]

**प्रा·डॉ·आनंद यादव** - "निबंध ही एक तर्कसंगतीच्या दिशेने व विचारांना महत्त्व देण्याच्या हेतूने विकसित झालेली अवस्था आहे· तर लघुनिबंध ही विचारापेक्षा ते विचार ज्या अनुभवाद्वारा सुचले त्या अनुभवांनाच महत्त्व देऊन त्या दिशेने विकसित झालेली अवस्था आहे·"[११]

**श्रीमती दुर्गा भागवत** - "कवितेप्रमाणे ललित लेखनाला भाववृत्तीत डूब घेण्याची आवश्यकता असते किंबहुना भाववृत्ती नसेल तर सृजनाचा अंकुर उगवणारच नाही· प्रीती, मृत्यू, प्रत्यक्ष जीवन आणि सृष्टींचा विराट पिसारा यांच्यातल्या अबोल रहस्यांची बोचणी लागल्यावाचून भाववृत्ती जागृत होत नाही·"[१२]

**प्रा·डॉ·चंद्रशेखर जहागिरदार** - "मूळ एकात्म, सर्वसमावेशक असलेल्या मराठी गद्याच्या विघटन प्रक्रियेतील "ललित गद्य" हा अगदी अलिकडील टप्पा आहे· लघुनिबंधातील गोष्टीवेल्हाळ उपदेशकाची किंवा मित्राची घेतलेली भूमिका जाऊन स्वैर आत्माविष्काराला ललित गद्यात महत्त्व आले· निबंधातील वैचारिकतेपेक्षाही लालित्य हा

भाषिक गुणधर्म महत्त्वाचा होऊन त्याद्वारे व्यक्त होणारे व्यक्तिमत्त्व केंद्रस्थानी आले."[१३]

प्रा. गंगाधर गाडगीळ - "ज्या ललित लेखनात आशय हा संपूर्णपणे नाट्य रूप धारण करतो, म्हणजेच लेखकाच्या व्यक्तिमत्त्वापासून अलग होतो. ते लेखन म्हणजे लघुकथा आणि ज्या ललित लेखनात असे होत नाही ते म्हणजे ललित निबंध असा भेद आपल्याला करता येईल. लघुकथेत निवेदक असतो आणि ललित निबंधातही असतो, परंतु लघुनिबंधातला निवेदक लेखकाच्या व्यक्तिमत्त्वापासून संपूर्णपणे अलग होत नाही. हे जे मी व्यक्तिमत्त्व म्हटले ते त्या लेखकाचे प्रत्यक्षातले व्यक्तिमत्त्व असेलच असे नाही. ललित निबंध लिहिण्यासाठी त्याने घेतलेली ती भूमिका असेल. पण ही भूमिका ललित निबंधाच्या आशयात विरघळून गेलेली नसते. त्या आशयाच्या संदर्भात लेखक स्वतःचे वेगळे व्यक्तिमत्त्व विसरून गेलेला नसतो. त्या आशयाचा तो एक भाग झालेला असतो."

गाडगीळ पुढे लिहितात, "ललित निबंधातल्या आशयाने संपूर्णपणे नाट्यरूप धारण केलेले असते. या गोष्टीचा आणखी एक परिणाम होतो ललित निबंधातील विविध घटक हे परस्परांशी एकजीव झालेले नसतात. त्यांचे परस्परांशी जे नाते असते ते एकसंध आशयाला नाट्यरूप देण्यासाठी निर्माण झालेले नसते. त्यांचे नाते निवेदकाने जोडलेले असते. निवेदकाची भूमिका अगर त्यांचा हेतू हे त्या घटकांना एकत्र आणणारे दुवे असतात. याचाच अर्थ असा की, त्या घटकांची रचना कलात्मकदृष्टया विस्कळीत असते."[१४]

प्रा. गाडगीळांच्या विवेचनावरून "ललित गद्य" "लघुकथा" हा कथनात्मक साहित्य प्रकार असूनही त्याच्यातील निवेदन आणि निवेदकाची भूमिका यांच्यात भिन्नता निर्माण झाल्यामुळे फरक पडतो हे स्पष्ट होते. लघुकथेत "मी" "मी" रहात नाही, आशयात विलीन होतो. "ललित गद्यात" "मी" "मी" रहातो. 'आशय' आणि "मी"

वेगळे रहातात, परिणामी दोन्ही वाङ्मयप्रकार स्वतंत्र होतात. गद्यांतर्गत कथनात्मक साहित्य प्रकार असून ही कथा, कादंबरी आणि "ललित गद्य" हे एकमेकांपेक्षा भिन्न आहेत आणि स्वतंत्रही आहेत हे स्पष्ट होते.

**स्वरूप विवेचन :-**

"ललित गद्या"विषयीच्या वरील विवेचनावरून निष्कर्ष असा निघतो की "मी" ला जे जे भिडले ते सर्व ललित गद्याचे विषय होऊ शकते.

अशा पध्दतीने मराठी लेखकाला इंग्रजीतून हा लघुनिबंध वाचावयाला मिळाला, वरवर सोपेपणा पण अंतर्यामी मुक्तचिंतन असा लघुनिबंध मराठीतही लिहिला जाऊ लागला.

प्रा. फडक्यांनी हा वाङ्मयप्रकार मराठीत रूजविला, खांडेकर, काणेकरांनी १९४० पर्यंत फुलविला. त्यांचे लघुनिबंध त्यांच्या त्यांच्या परीने वैशिष्टयपूर्ण आहेत. याच काळात "गुजगोष्टी" की "आत्मनिबंध" की "ललित निबंध" या वादातून "लघुनिबंध" रूढ झाला. या प्रकाराचा मराठीतील जनक कोण ? यावर वाद झाला. ही पताका प्रथम आपण खांद्यावर घेतली असा दावा प्रा. फडक्यांनी मांडला. यावर डॉ. आनंद यादवांनी विस्तृत लेखन करून, वि. स. खांडेकरांनी १९२७ च्या "वैनतेय" मध्ये "लघुलेख" ह्या नावाने प्रथम लघुनिबंध लिहिला तर १९२६ ते १९३१ ना. सी. फडक्यांनी कंसात निबंधात्मक म्हणून "गुजगोष्टी" नावाखाली लघुनिबंध लिहिला म्हणून लघुनिबंधाचे जनकत्व खांडेकरांना तर प्रवर्त्तक प्रा. फडक्यांना बहाल केले आहे.

१९३१ नंतर प्रा. फडक्यांनी मराठी लघुनिबंध "तंत्र आणि मंत्र" यात बसविला. त्याची चौकट पक्की केली. कथनात्मक साहित्यप्रकाराच्या बांधणीचे, रचनेचे त्यांनी आराखडे मांडले. मराठी लघुनिबंध लोकप्रिय केला.

रचनेच्या अनुकरणात व लोकप्रियतेच्या स्वरूपात थोडयाच काळात "लघुनिबंधाला" बेगडी स्वरूप आले व "कृतक लघुनिबंध" लिहिला जाऊ लागला. "कृतक लघुनिबंध" म्हणजे विचारामध्ये सहजता, उत्स्फूर्तता नसलेला, विशिष्ट प्रकारची भूमिका अगोदर स्वतःशी स्वीकारून त्यानुसार लिहिलेला लघुनिबंध. त्यामुळे हा नटवा झाला, मनाची स्वैर क्रीडा गेली, चिंतन गेले, नाटकी आविर्भाव शिल्लक राहिल्याने हा लघुनिबंध खुरटला

गेला. लघुनिबंधाच्या या बेगडी स्वरूपावर ज्ञानेश्वर नाडकर्णी, प्रा.रा.भी.जोशी आणि प्रा.वा.ल.कुलकर्णी यांनी परखड प्रतिक्रिया व्यक्त करून "लघुनिबंध" हा वाङ्मय-प्रकार निःसत्त्व होण्याची कारणमीमांसा केली आहे.[१५]

अशा या काळात "लघुनिबंधाला" सावरण्याचा प्रयत्न वि.स.खांडेकर, अनंत काणेकर, ना.मा.सन्त, कुसुमावती देशपांडे, वि.त.ब्र्वे, गो.रा.दोडके अशा लघुनिबंधकारांनी केला आहे.

लघुनिबंधकाराला खेळकरपणा हा उपकारक असेल पण तो खरोखर "गुजगोष्टी" म्हणजे अंतःकरणातील "गुज"व्हायचा असेल तर लेखकाची जीवनाकडे पाहण्याची दृष्टी कशी आहे, लेखक जीवनानुभव कसा पेलतो, त्याची चिंतनशीलता, त्याची सामाजिक दृष्टी थोडक्यात म्हणजे जीवनाची व्यामिश्रता जाणण्याची त्याच्या व्यक्तिमत्त्वाची कुवत ही लघुनिबंध समृध्द व्हायला कारणीभूत ठरत असते. उदा.खांडेकरांच्या लघुनिबंधाची जातकुळी मराठी आहे. मराठी साहित्य परंपरेत तो जन्मला व पर्सनल एसेच्याआधारे वाढला, हरिभाऊ ते गडकरी असा वारसा आहे, अलंकरणाचा सोस आहे. चिंतनात्मक अनुभवाला त्यांच्या लघुनिबंधात प्राधान्य आहे.

तर फडक्यांची लघुनिबंधाची जातकुळी आस्वादशील आहे, ती रसिकाची आहे. त्यामुळे सामान्य विषय प्रतिष्ठा पावतो. यासाठी इंग्रजी तंत्राचा त्यांनी जाणिवपूर्वक वापर केला आहे. प्रसन्न भाषाशैलीविषयी खूपशी दक्षता घेतलेली आहे.

काणेकरांचा मानवी जीवन विचार, कुसुमावती देशपांड्यांच्या वृत्तीतील काव्यात्मता, ना.मा.संतांची भावात्मकता, दोडक्यांच्या मधील रसिकता यांनी त्यांच्या लघुनिबंधांना वैशिष्टयपूर्ण केले आहे.

लघुनिबंधाच्या विषयांचा, वैशिष्टयांचा आवाका १९४५ पर्यंत स्थिर राहिला, पण नंतर सर्व मराठी वाङ्मय अंतर्बाह्य बदलत होते आशय, अभिव्यक्ती इत्यादी बाबतीत अर्थपूर्ण बदल घडू लागले होते. लघुनिबंधही बदलू लागला. ललित निबंधाकडे वळू लागला. ललित निबंधाने चौकट मोडण्याचा प्रयत्न केला, विषय गंभीरपणे अंतर्मुख वृत्तीने प्रदर्शनीय "मी" ला नाकारून "मी" च्या व्यक्तित्वाचे मनःपूर्वक दर्शन घडविले.

१९५० पासून या लेखनप्रकारात हा बदल घडून आला· हा नवा "ललित गद्य" वाङ्मय प्रकार, नव्या प्रवृत्तींचा, नव्या समाजरचनेचा, नव्या जाणिवांचा निदर्शक आहे· खेळकरपणा हा बहाणा किंवा मुखवटा नसून लेखकाच्या व्यक्तित्वसंपन्नतेचा तो सहज सुंदर आविष्कार आहे· गमतीचेच विचार मनात येण्याची आवश्यकता नसून अत्यंत गंभीर अशा चिंतनशील दृष्टिकोणातूनही "ललित गद्य" अवतरू शकते, कोणत्याही भाववृत्तीचा किंवा मनोभावनेचा आविष्कारही लेखकाच्या व्यक्तित्वानुसार अनेकविध रूपे धारण करू शकतो·

"लघुनिबंध", "ललित गद्य" झाल्याची स्पष्ट प्रचिती १९५० च्याच आगेमागे प्रसिध्द झालेल्या "परिपूर्ती" (इरावती कर्वे, १९४९), "ऋतुचक्र" (दुर्गा भागवत, १९५६), "स्पर्शाची पालवी" (गो·वि·करंदीकर, १९५८) या सारख्या संग्रहातून आपल्याला मिळते·

लघुनिबंध म्हणजे हलकाफुलका, गंमत जंमत करीत जाणारा चमकृतिजन्य कल्पना मांडणारा, या उलट असल्या कल्पनांना थारा न देणारा आणि तरीही "माझा विषय मीच आहे" हे सूत्र न सोडणारा असा हा "ललित गद्य" नाजूक,व तरल संवेदना, सूक्ष्म व उत्कट भावना, तर्कशुध्द आणि तत्त्वजिज्ञासू विचार, तीव्र भावानुभव, निसर्गाची बदलती रूपे, ऋतूंचा लावण्यमहोत्सव टिपता टिपतानाच त्यामागे असलेले डोळस कुतूहल, काव्याला प्रतिभा, रूप रसगंधाचे उत्कट भान या कुणाच्याही व्यक्तिमत्त्वाला समृध्द करणा-या वैशिष्ट्यांनी हा "ललित गद्य" वाङ्मयप्रकार पुरेपूर भरला आहे· त्याला कुठला विषय पारखा वाटतच नाही· उत्खननापासून वास्तुपुरूषापर्यंत सगळे विषय त्याचे असतात· उदा·इरावती कर्वे "भोवरा"(१९६०), "गंगाजल" (१९७६) दुर्गा भागवत "भावमुद्रा"(१९६०) ,"पैस" (१९७०), गो·वि·करंदीकर "आकाशाचा अर्थ "(१९६५) ग्रेस "चर्चबेल" (१९७४) ,"मितवा" (१९८७), विजय तेंडुलकर "कोवळी उन्हे" (१९७१) शरच्चंद्र चिरमुले "वास्तुपुरूष" (१९८६) अशी काही नावे म्हणजे मराठी ललित गद्यातील उत्कृष्ट नमुने आहेत·

असा हा "ललित गद्य" वाङ्मय प्रकार मोठा बहुरंगी व बहुरूपी आहे· नवी रूपे, त्या रूपांचे जीवनाच्या संदर्भात अर्थ शोधण्याचे वेड ललित गद्याला आहे· त्यामुळे तो शिळा व्हायचा नाही, आवर्तात सापडायचा नाही हे या ललित गद्याचे सामर्थ्य

आहे· एवढेच नव्हे तर या ललित गद्याने इतर वाङ्मय प्रकारातही आपला प्रवेश केला आहे· आजच्या नवकथालेखनातील कित्येक कथांचा तोंडवळा ललित गद्यासारखा आहे· प्रवासवर्णन, व्यक्तिचित्रणात्मक लेखन, ललित लेखन इ· प्रकारातून या "ललित गद्याने" स्वतःचा शिरकाव करून स्वतःला अभिवृध्द केले आहे·

१९५० नंतर विकसित झालेल्या या ललित गद्याचे "आत्मनिष्ठा" किंवा "मी"त्व हेच व्यवच्छेदक लक्षण असलेले दिसून येते· १९२५ ते १९४५ काळात प्रवासवर्णने लघुलेख, ललित लेख, आठवणी इ·प्रकारच्या स्फुट लेखनातून "मी"त्वाची किंवा "मी"च्या व्यक्तित्वाची जाणीव अभावानेच दिसून येते·

१९५० च्या आसपास जागतिक साहित्याचेच स्वरूप अंतर्बाह्य पालटल्याचा प्रत्यय येत होता· मराठी साहित्यातही हा बदल होत होता· साहित्याचा नव्याने विचार, समीक्षा, सर्जनता आणि स्वरूपाच्या पातळीवर होत होता· नवसाहित्यात "लेखकाची आत्मनिष्ठा" विविध अंगांनी प्रतिष्ठा पावत होती, प्रभावी ठरत होती· साहित्य निर्मितीत आत्मनिष्ठा ही जणू साहित्याचा मूलभूत घटक बनली· त्याबरोबर साहित्याची भाषा, प्रतिमा, तिचे स्थान व कार्य, सौंदर्य संघटनाचे भान, कलात्मक घटकांचे बदलते स्थान व कार्य, आत्मशोधाची जाणीव, अंतर्मनाच्या सुप्त, अर्धसुप्त , मनोव्यापाराचा वेध यामुळे नवसाहित्य उजळून निघाले·

अशा वळणांवर इरावती कर्वे, दुर्गा भागवत, गो·वि·करंदीकर इत्यादी लेखकांनी लघुनिबंधाचे लेखन जाणिवेने सुरू केले· पण नवसाहित्याच्या या काळात साहित्याची मांडणी नव्याने झाली· साहित्य प्रकाराच्या व्याख्या बदलल्या त्याप्रमाणे "मी"त्वाच्या जाणवेने अवतरणारे गद्याचे स्फुट प्रकार "ललित गद्य" या नावाने ओळखले जाऊ लागले, प्रसिध्द होऊ लागले· लघुनिबंधातील "मी"त्वाची जाणीव नवे रूप घेऊन व्यक्तिचित्रे, प्रवास वर्णन, आठवणी, अनुभव, ललित लेख यातून पसरू लागली नि तिनेच "ललित गद्याचे" नवे रूप धारण केले·

१९५० नंतरचा हे ललित गद्य आत्मनिष्ठ "मी"त्वाच्या आविष्कारात, शोधात गुंतले , अनुभवाच्या भावस्थितीनुसार त्याची भाषा व मांडणी आकार घेऊ लागली· नटवी आत्मप्रदर्शनात्मकता जाऊन मनःपूर्वक "मी"त्वाचे दर्शन झाले· मुद्दाम पवित्रा

घेऊन सांगणा-या ठोस विचारांचे स्वरूप जाऊन तो अंतर्यामी गंभीर बनला·

प्रवास वर्णनात देखील स्थळ व प्रदेश पहाणारा जो "मी" आहे, त्याला महत्त्व आले आणि प्रवास लेखनाचे अंतरंग, बहिरंग पालटून गेले· उदा· १ "गोपुरांच्या प्रदेशात", १९५२ - गंगाधर गाडगीळ, २ "साता समुद्रा पलीकडे" १९५९ - गंगाधर गाडगीळ, ३ "ताकोनामा" १९५९ - प्रभाकर पाध्ये, ४ "अपूर्वाई", १९६० "पूर्वरंग" १९६३ पु·ल·देशपांडे·

"आठवणी अनुभव" विषयक लेखात हा "मी" महत्त्वाचा ठरलेला दिसतो· "विषयवस्तू" आणि "मी" या ठिकाणी समरूप होऊन जातात·

पन्नास नंतर "ललित लेखात" "मी"त्वाची जाणीव आलेली दिसते· ललित लेखात लघुनिबंधातल्याप्रमाणे व्यक्तिव्यतिरिक्त अशी विषयवस्तू असते· मात्र लघुनिबंधातल्याप्रमाणे ती निमित्तमात्र करून "मी"त्वाचा आविष्कार झालेला नसतो· तर ती इथे (ललित लेखात) प्रस्तुत विषय झालेली असते· इथे "मी"त्वाचा आविष्कार "मी"च्या नावे होत नाही· "मी"ने इथे पृष्ठभूमीवरून स्वतःचा लोप करून घेतलेला असतो आणि अंतःप्रवाहासारखा (अंडर करंट) अंतरंगात भिनून राहिलेला असतो· त्याने जो विषयवस्तूचा अनुभव घेतलेला असतो, त्या अनुभवातील "मी"पणाचा लोप करून तो अनुभव वस्तुनिष्ठ दाखवण्याचा आभास लेखकाने निर्माण केलेला असतो· विषयवस्तू लेखकातील "मी"ने अनुभवलेली आहे, याच्या पाऊलखुणा जागोजागी त्या लेखनात उमटलेल्या असतात· "मी" चा उल्लेख न करता लेखन करण्याचा हा प्रकार म्हणजे ललित लेख होय· माधव आचवल, "किमया", अनिल अवचट, "माणसं" मधील लेख या दृष्टीने पाहण्यासारखे आहेत·

अशा रीतीने या उपप्रकारांनी विषय वस्तुनिष्ठेकडून वैशिष्ट्यपूर्ण आत्मनिष्ठेकडे वाटचाल केलेली दिसते· "ललित गद्य" या समावेशक शीर्षकाखाली ही विविध रूपे आकाराला येताना दिसतात· त्यामुळे ललित गद्य हे कुटुंब मानावे लागेल· "विषय-वस्तू" आणि "मी"त्व हे जणू प्रकृती आणि पुरुष यांचे द्वंद्व असून, त्यांच्या मीलनातून जन्माला आलेले लघुनिबंध, ललित निबंध, ललित लेख, प्रवास लेख, व्यक्तिचित्र, आठवणी, अनुभव हे या कुटुंबाचे घटक मानावे लागतील, पण सर्वांच्या मध्ये "मी"त्वाचा आविष्कार

हे एक लक्षण असले तरी त्यांची बाकीची गुणात्मक वैशिष्ट्ये काही प्रमाणात एकमेकापेक्षा वेगळी आहेत·

"ललित गद्यातील" लघुनिबंध, ललित निबंध, प्रवास लेख या प्रकारात "मी"त्वाचा आविष्कार ठळकपणे दिसतो, तर ललित लेख, व्यक्तिचित्र या प्रकारात "विषयवस्तूच" "मी"त्वाच्या आविष्कारात तुलनेने प्रभावी ठरते·

आपण पाहिलेले ललित गद्याचे स्वरूप व विकास लक्षात घेता, "ललित गद्य " हा साहित्यप्रकार सर्जनप्रक्रियेत द्विकेंद्रीय अवस्थेत असतो· एक "मी"त्व व दोन "मी"त्व जिच्या आधारे व्यक्त होऊ पहाते ती विषयवस्तू· कोणत्याही "अनुभवाकडे पहाण्यात द्विकेंद्रीय अवस्था असतेच पण अधिक वास्तव स्वरूपात ती ललित गद्यात व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य लेखकाला मिळते· "ललित गद्य" हा वाङ्·मय प्रकार आपल्या सीमारेषा विविध स्वरूपात उल्लंघत असताना दिसतो, किंबहुना एखाद्या वाङ्ःमय प्रकाराने आपल्या सीमारेखा उल्लंघून जाणे हे त्यातील चैतन्याचे लक्षण आहे आणि अशा उल्लंघनातच त्या वाङ्मयप्रकारचो विकासाची वाट रेखली जात असते· "ललित गद्याची" ही "लघुनिबंध- "ललित निबंध"- "ललित लेख" अशी चैतन्यमय विकासाची वाट आपल्याला स्पष्ट जाणवते·

"ललित गद्या"चे स्वरूप व विकास पाहिल्यानंतर "मराठी ललित गद्याचा" स्थूल आढावा घेऊ·

## मराठी ललित गद्याचा स्थूल आढावा :-

### ऐतिहासिक मागोवा :-

मुकुंदराजांच्या "विवेकसिंधू"पासून ते थेट रामदासांच्या "दासबोधा"पर्यंत प्रसिध्द झालेल्या ग्रंथांत "ललित गद्य" या वाङ्मय प्रकारातील अनेक वैशिष्ट्यांचे दर्शन घडते· चक्रधरांच्या "सिध्दान्त सूत्रांत" आणि "दृष्टान्तपाठा"त व महानुभावांच्या अनेक गद्य ग्रंथात हा निबंध व्यक्तिचित्रे, बोलीभाषेचो लय व लकब असणारी शैली, प्रसंग, स्थळ वर्णन, अध्यात्म, तत्त्व विवेचन इत्यादी स्वरूपात भेटतो, तर बखर वाङ्मयातील कित्येक परिच्छेद हे गद्याचे उत्तम नमुने वाटतात· कारण निवेदन, वर्णन, मतप्रतिपादन,

विवेचन ही निबंधात येणारी वैशिष्ट्ये या वाङ्‌मय प्रकारात सापडतात."[१६]

"महानुभाव व बखर वाङ्‌मयात दिसून येणारी मराठी गद्यपरंपरा पाहिली तर लक्षात येते की, या गद्याचे स्वरूप सर्वसमावेशक स्वरूपाचे होते. व्यक्तिचित्रण, समाज दर्शन, अध्यात्मचिंतन , तत्त्वचर्चा, विनोदात्मकता इत्यादी विविध हेतूंसाठी या गद्याचा वापर करण्यात आला."[१७]

या वरील विवेचनावरून आपल्याला मराठी ललित गद्याची प्राचीनतम परंपरा लक्षात येते तर आधुनिक मराठी ललित गद्याचा आढावा घेताना आपल्याला अव्वल इंग्रजी कालखंडाचा विचार करावा लागेल. कारण इंग्रजांच्या राज्यामुळे व इंग्रजीच्या प्रसारामुळे महाराष्ट्राच्या विचार, आचार एकूण जीवनक्रमात जी स्थित्यंतरे होऊ लागली त्याची प्रतिबिंबे वाङ्‌मयातही उमटली. ललित गद्यही त्याला अपवाद नाही. ती स्थित्यंतरे पहाणे म्हणजे ललित गद्याचा आढावा घेणे होय.

## १८१८ ते १८७४ चा कालखंड

बाळशास्त्री जांभेकर (दर्पणकार), भाऊ महाजन, बापू छत्रे, जोतिराव फुले, बाबा पद्‌मनजी, लोकहितवादी, दादोबा पांडुरंग, परशराम तात्या गोडबोले, हरि केशवजी, कृष्णशास्त्री चिपळूणकर, रा.भि.गुंजीकर इत्यादी निबंधकार या काळात झाले.

"या काळातील निबंध वाङ्‌मय प्राथमिक स्वरूपाचेच होते. कारण १९७४ पूर्वीच्या बहुतेक निबंधकारांच्या दृष्टीने लेखन हे ज्ञानप्रसाराचे व समाजसुधारणेचे एक साधन होते, त्यामुळे आपला विचार नटवून, सजवून, फुलवून किंवा साहित्यगुणात घोळवून सांगण्याचा प्रयत्न करणारा निबंधकार झाला नाही."[१८] इंग्रजी ज्ञानामुळे, भौतिक शास्त्राचा परिचय, व्यक्तिस्वातंत्र्य मिशनरी वृत्तीची जाण यामुळे शिक्षित तरूण पिढीच्या मनातील विचारांचा संघर्ष, वादविवाद, विचारमंथन व तत्कालीन सभा, संस्था व वृत्तपत्रीय लेखन यांमधून मराठी निबंधाचा विकास होत गेला.

मराठी निबंध पुस्तकीपणापासून अलिप्त राहून सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक अशा जाणिवांच्या उद्‌घोष करू लागला.

लोकहितवादींच्यामुळे तर मराठी निबंधाने शालेयोपयोगितेची, पुस्तकीपणाची, अनुवादाची बाह्य शैलीची व ललितेतर वैशिष्ट्यांची सरहद्द ओलांडली व तो प्रौढ झाला.

१८७४ ते १९२०चा कालखंड :-

हा पन्नास वर्षांनी अव्वल इंग्रजीतील दुसरा टप्पा. हा कालखंड म्हणजे अर्वाचीन निबंध वाङ्मयाचे सुवर्ण युग, निबंधाचा अनेक अंगांनी विस्तार झाला. प्रा. चंद्रशेखर जहागिरदार म्हणतात, " १९ व्या शतकातील पत्रकारितेत वाढ आणि दुसरे म्हणजे त्याच प्रबोधन काळात स्थिर झालेले व्यक्तिनिष्ठ व व्यक्तिवाद हे मूल्य. त्यामुळे व्यक्तीच्या वैचारिक जीवनाच्या आविष्कारासाठी गद्याचा वापर प्रामुख्याने करण्यात आला आणि व्यक्तिनिष्ठ वैचारिक गद्याची परंपरा सुरू झाली. फुले, आगरकर, टिळक इत्यादींनी ही परंपरा समृध्द केली तर संस्कृतप्रचुर काव्यात्मतेची जोड देऊन शि. म. परांजप्यांनी ते वाचनानुकुल असे केले."[१९]

विष्णूशास्त्री चिपळूणकर :-

"निबंधमाले"चा आरंभ हा महाराष्ट्रातील नव्या युगाची नांदी ठरला. चिपळूणकरांच्या स्वाभिमानी, स्वदेश व स्वभाषा प्रेमाने उजळून निघालेल्या निबंधांनी मराठी निबंधाला आत्मतेज दिले. मराठी निबंध नीटनेटका चित्ताकर्षक व मनोरम केला. "निबंधमालेचा उद्देश", "मराठी कविता", "आमच्या देशाची स्थिती", "लोकभ्रम", "देशोन्नती" या निबंधांवरून त्यांच्या निबंधाची विविधता स्पष्ट होते. १

लोकमान्य टिळक :-

केसरी-मराठातून परखड लेखन, व्यासंग, तर्कशुध्दता, ओजस्विता, निर्भयता, प्रतिपादनाला भारतीय जाणिवांचा आधार ही टिळकांच्या निबंधाची वैशिष्ट्ये होत.

गो. ग. आगरकर :-

मराठी निबंधाला प्रौढत्व प्राप्त करून दिले. सनातन, आंधळ्या परंपरेवर प्रहार, व्यक्तिस्वातंत्र्य, समाज सुधारणेची तळमळ ही त्यांची अधिष्ठाने निबंधाला लाभली आहेत. विचार सौंदर्य, भाषा सौंदर्य, शैलीची सुंदरता यांनी त्यांचे निबंध समृध्द झाले आहेत.

" १९२६ ला जो ललित निबंध अवतरला हलका, फुलका या लक्षणासह त्या ललित निबंधाचा विचार करता आगरकरांचे निबंध ललित निबंध म्हणून दुर्लक्षिता

येत नाहीत. कारण साध्यासुध्या क्षुद्र विषयांवर आगरकरांनी लेखणी चालवलेली आहे. उदा. "आमच्या स्त्रियांचा पेहराव", "सोवळ्याची मीमांसा", "आमचे प्रेत संस्कार", "हजामत", "जोडा" इत्यादी. म्हणजे आगरकरांच्या निबंधात ललित निबंधाची बीजे दिसतात." [२०]

**शि.म.परांजपे :-**

राष्ट्रप्रेमाने प्रेरित झालेल्या "काळ"कर्त्या परांजप्यांच्या निबंधात ललित निबंधाचा विकास झालेला दिसतो. "भासाची भवितव्यता" यासारख्या निबंधातून काव्यमयतेबरोबर नितांत आत्मनिष्ठा प्रगट होताना दिसते. राजकीय असंतोष निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न, "ध्रुवाची गोष्ट" तर "शिवाजीची एक रात्र" मध्ये प्रत्ययास येतो. तर त्यांच्या रसिकवृत्तीचा अनुभव "सापडलेले संपुष्ट" सारख्या काव्यपूर्ण निबंधात येतो. काळातील निबंध खांडेकरांना "अग्निनृत्या" सारखे वाटतात तर आचार्य जावडेकरांना "स्वातंत्र्य-सूक्त" वाटतात, अशी विशेष मान्यता त्यांच्या निबंधाला प्राप्त झाली.

**न.चिं.केळकर :-**

साहित्यसम्राट पदाला शोभेल अशीच मराठी निबंध वाङ्मयात त्यांची भरीव कामगिरी आहे. त्यांच्या लेखनातील विनोदचातुर्य रंजकता, आशयघनता, सहृदयता, सहानुभूती, आत्मनिष्ठता, भावात्मकता, मार्मिक विनोद चातुर्य यांनी मराठी निबंधाला समतोल आकर्षक व्यक्तिमत्त्व लाभले आहे. पांडित्याला प्रसन्नतेचा व लालित्याला मोहकतेची रूपे देऊन मराठी ललित लेखनाला समृध्द केले. उदा."शनिवारवाड्याचा जीर्णोध्दार", "काव्यदृष्टी", "भविष्यकथन", "लोकमान्य टिळकांचा मृत्युलेख" इत्यादी विषयांवर त्यांच्या प्रतिभेचा मनोज्ञ संचार दिसून येतो.

**अच्युत बळवंत कोल्हटकर :-**

संदेशकार, विनोदकार, निबंधलेखक म्हणून परिचित आहेत. त्यांचे सारे निबंध स्वदेशप्रेम, धर्मप्रेम व स्वातंत्र्यप्रेमातून उदयाला आलेले. त्यांची लेखणी भावोत्कट तशी तिखट, स्वतंत्रविषय, खुमासदारशैली, विनोदीवृत्ती सूत्र राजकारणाचे, वेधकतेची झालर यांनी त्यांचा निबंध पूर्वीच्या प्रौढ, गंभीर निबंधाचा मुखडाच बदलून टाकताना दिसतो. "कोळसा", "लोखंड आणि बर्फ", "पुणेरी जोडे", "बोंबाबोंब",

हे निबंध म्हणजे वाचकाला मेजवानीच· त्यांनी मराठी निबंधात रंजकता, रोचकता आणली व निबंध सामान्य जीवनाशी निगडित केला· निबंधात अंतर्बाह्य बदल घडून आला·

याशिवाय म·गो·रानडे, राजवाडे, सावरकर इत्यादींनी निबंध वाङ्मय समृध्द केले· तत्कालीन अनेक निबंधकारांचे कर्तृत्व मान्य करूनही या कालखंडातला निबंध चिपळूणकर, आगरकर, परांजपे, केळकरांनी घडविला असेच म्हणावे लागेल·

**१९२० ते १९४५ चा कालखंड :-**

"पत्रकारितेशी निगडित असणा-या वैचारिक गद्याला लघुनिबंध हा अधिक वाचकानुकूल असा पर्याय निर्माण झाला असे नमूद करून इंग्रजी गद्य परंपरेतील लिंड, गार्डनर सारख्या तृतीय दर्जाच्या लेखकांचा लघुनिबंधाच्या निर्मितीवर पडलेला प्रभाव, हलका फुलका, चिंतनशीलतेचा आव आणणारा मध्यमवर्गीय मनाला रिझवणारा हा लघुनिबंध वैचारिक गद्य परंपरेला पर्याय निर्माण झाला आहे·"[२१] असे प्रतिपादन प्रा·चंद्रशेखर जहागिरदार यांनी केले आहे·

लघुनिबंध निर्मितीच्या या कालखंडाचा आढावा घेऊ·

**प्रा·ना·सी·फडके :-**

फडक्यांच्या केळकरी वळणाच्या लघुनिबंधाने अनुकूल वातावरण तयार केले· "कलेसाठी कला" अशा प्रकारच्या लेखनासाठी फडक्यांनी भूमी तयार केली, बैठक निश्चित केली· तंत्र आणि मंत्र आखून, कथनात्मक साहित्य प्रकाराच्या बांधणीचे, रचनेचे त्यांनी आराखडे मांडले, त्यांचे लघुनिबंध "गुजगोष्टी" १९३३ , "नव्या गुजगोष्टी" १९३७ 'धूम्रवलये" १९४१ या संग्रहातून वाचावयाला मिळतात· आकर्षक, सहज, सुलभ व लालित्यपूर्ण भाषाशैली, हलकाफुलका विषय, तो खुलवण्याचे कौशल्य, आठवणी, आत्मनिवेदनाची गुंफण, मार्मिक शेवट ही त्यांच्या लघुनिबंध लेखनाची वैशिष्ट्ये आढळतात· "पांढरा केस", "हरवली म्हणून सापडली", "छत्री" हे त्यांचे काही महत्त्वाचे लघुनिबंध·

**वि·स·खांडेकर :-**

जीवनासाठी कला असे मानणारे खांडेकर अंतर्मुख वृत्तीचे आहेत· त्यामुळे त्यांच्या लघुनिबंध लेखनातही चिंतनशीलतेचा प्रत्यय येतो, "मानवी जीवनाचे जिव्हाळ्याने

केलेले चिंतन व त्यातून स्फुरलेला विचार विलास म्हणजे लघुनिबंध" अशी त्यांची धारणा आहे. जीवनावर नितांत श्रध्दा, मांगल्याचा ध्यास, जीवनमूल्यांची जोपासना, मानवतावादी दृष्टिकोण या सर्वांचे दर्शन त्यांच्या लघुनिबंधात घडते. "सुखाचा शोध", "अर्पण पत्रिका", "वायुलहरी" "संकेत", "एक लाखाचे बक्षीस" ह्या लघुनिबंधांत वरील लेखनवैशिष्ट्ये स्पष्टपणे दिसून येतात. "वायुलहरी"(१९३६), "चांदण्यात"(१९३८), "सायंकाळ"(१९३९) "अविनाश"(१९४१), "मंजि-या"(१९४४) व "कल्पलता"(१९४५) हे त्यांचे लघुनिबंध संग्रह प्रसिध्द आहेत.

**अनंत काणेकर :-**

काणेकरांचा लघुनिबंध तर आपल्या भोवतीचा समाज, मानवी जीवन, स्वभावविशेष याविषयीचे विचार मनाशी पक्का करून तो चटकदार उदाहरणांनी मांडणे ही त्यांची कल्पना त्यांच्या बहुसंख्य निबंधात दिसते. "पिकली पाने" (१९३४), "शिंपले आणि मोती" (१९३६), "तुटलेले तारे"(१९३८), "उघडया खिडक्या" (१९४४), "प्रकाशाची दारे" (१९७०) इत्यादी संग्रहात त्यांचे वरील विशेष आढळतात.

**ना.म.संत :-**

"उघडे लिफाफे"(१९३४) या लघुनिबंध संग्रहातून त्यांची भावात्मकता, रसिकता स्पष्टपणे दिसून येते. "एक खेदजनक विचार", "आजारीपणाचं सुख" ही खट्याळ पुस्तके ह्या लघुनिबंधातून त्यांची लेखनवैशिष्टये व रसिक व्यक्तिमत्त्व प्रतिबिंबित झालेले दिसून येते.

संतांनी लघुनिबंधाचे निखळ रूप शोधले. लघुनिबंधाला तंत्रनिष्ठ व वाचकनिष्ठ मर्यादातून बाहेर काढले.

**कुसुमावती देशपांडे :-**

कुसुमावतींनी लघुनिबंधाचे एक सतेज रूप दाखवून दिले. निसर्ग, प्रतिमा, अल्पाक्षरत्व, संयमी भाषा एका वेगळ्या भावात्मक पातळीवरचे चिंतन, अनुभवातील गंभीरपणा त्यांच्या लघुनिबंधातून मराठी लघुनिबंधात प्रथमच अवतरला, "पारिजात", "नवे लेणे" संग्रहातील "चंद्रास्त", "मध्यान्ह" व "मध्यरात्र" हे लघुनिबंध कुसुमावतींच्या

लेखनवैशिष्ट्यांसह येतात. त्यांनी लघुनिबंधाला विश्वात्मकता प्राप्त करून दिली.

वि.ल.बर्वे (पिसारा), वि.पां.दांडेकर (फेरफटका १९३६ ), (टेकडीवरून १९३७ ), रघुवीर सामंत (पणत्या १९३९ ), गो.रा.दोडके ("एकच सिगरेट"व"पुस्तक") हे लघुनिबंध लेखनही विचारात घ्यावे लागेल.

## स्वातंत्र्योत्तर काळातील ललित गद्य :-

### इरावती कर्वे :-

"परिपूर्ती"(१९४८) हा इरावती कर्वेंचा संग्रह प्रसिध्द झाला नि लघुनिबंधाला नवे वळण स्पष्टपणे मिळाले. "भोवरा"(१९६० ), "गंगाजळ"(१९७२ ), या संग्रहांनी मराठी लघुनिबंध वाङ्:मय समृध्द केले. इरावतीबाईंच्या लघुनिबंधांनी "मी" चे अनुभवरूप स्वीकारले. तंत्र व उप-या जाणीवा नाकारल्या, कौटुंबिक, समाजशास्त्रीय, जगभरच्या प्रवासातील सांस्कृतिक व्यापक अनुभव सखोलपणे व जोमदारपणे आविष्कृत केले. भाषा प्रांजळ, पारदर्शी, साधी पण चिंतन, विद्वत्ता, विचारी मनाच्या स्पंदनांनी गहिरी होत जाणारी यामुळे त्यांचा लघुनिबंध अंतर्बाह्य वेगळा झाला. लघुनिबंधाला ख-या अर्थाने अव्वल दर्जाचे व्यक्तिमत्त्व लागते हे त्यांच्या निबंधावरून स्पष्ट झाले.

### गो.वि.करंदीकर :-

जुन्या लघुनिबंधाची शक्तिस्थाने हेरून, त्यांना आत्मसात करत, त्यातील उप-या बाबींना नाकारत, लघुनिबंधाच्या प्रत्येक घटकातील मूळरूप शोधून त्याचा वापर करत, विविध रूपात तो आविष्कृत करत लेखन करणारे लघुनिबंधकार म्हणजे गो.वि.करंदीकर होत. गो.वि.करंदीकरांनी लघुनिबंध अंतर्बाह्य बदलला. आशयाच्या आवश्यकतेनुसार अनुभव चिंतन, कधी कवितेप्रमाणे प्रतीकात्मक तर कधी कहाणीचे रूप अशा विविध स्वरूपात त्यांनी लघुनिबंधाची मांडणी नवे नवे घाट शोधत केली. त्यांच्या लघुनिबंधाचा आशय सामाजिक, वस्तुनिष्ठ, आधुनिक स्वरूपाचा आहे. टीकात्म, उपरोधात्म, विनोदात्म, काव्यात्म, भयात्म अशा विविध भाववृत्ती त्यांच्या लघुनिबंधाला लाभल्या आहेत. "मी"ची संपूर्ण स्वतंत्र विचारशील वृत्ती, विचारातील गुंतागुंत आणि बारकावे उलगडून दाखविण्याचे विलक्षण सामर्थ्य, नवी भाषिक जाणीव ह्या वैशिष्ट्यांमुळे मराठी लघुनिबंधाचा सहमुखी विकास करंदीकरांनी केला आहे. जाणीवपूर्वक लेखनात प्रयोगशील असणारे हे व्यक्तिमत्त्व

"स्पर्शाची पालवी" (१९५९) व "आकाशाचा अर्थ" (१९६५) अशा दोन संग्रहांनी प्रसिध्द आहे·

दुर्गा भागवत :-

"ऋतुचक्र" (१९५६) "भावमुद्रा" (१९६०), "व्यासपर्व" (१९६२), "रूपरंग" (१९६७) "पैस" (१९७०) या संग्रहातून त्यांनी ललित गद्याच्या अंतर्गत असणारे गौण वाङ्मयप्रकार असणारे, विविध विषय हाताळले आहेत· दुर्गा भागवतांचे लेखन कुसुमावतीच्या भाववृत्तीशी नाते सांगत विकास पावते· आरंभापासून निसर्गाशी जवळीक, अंतर्मुख चैतन्यशील व चिंतनशील वृत्ती अशी, वैशिष्टये यांच्या लेखनात आढळतात·

दुर्गा भागवतांची भाषा मनात भरते, तिचे म्हणून एक सौंदर्य आहे· संस्कृत शब्द, संस्कृत साहित्य कल्पना, कविसंकेत , हे सहज, चपखल या लघुनिबंधात बसून जातात· त्यामुळे ती अभिजात वाटते· त्यांनी चाकोरीबाहेर जाऊन स्वतंत्रपणे लघुनिबंध लेखन केले नि त्यास नवे रूप प्राप्त झाले·

मंगेश पाडगावकर :-

"निंबोणीच्या झाडामागे" (१९५६) या संग्रहात निसर्गाशी नाते सांगत कविमनच लघुनिबंधात कार्यप्रवण झाल्याचे दिसते·

माधव आचवल :-

"किमया"तील (१९६१) लेख एका बाजूने आचवलांच्या कविमनाचे सौंदर्यात्म आविष्करण करतात तर दुस-या बाजूने वास्तुकलेतील अनेक घटकांचा उपयोग तज्ज्ञांच्या सौंदर्य दृष्टीने कसा करून घेता येतो, कसा करून घेतला जातो हे दाखवून देतात·

प्राणहिता :-

संख्येने कमी पण गुणांनी विशेष असे १० ते १५ च्या आसपास लघुनिबंध आहेत· मालवण व महाविद्यालयीन जीवनातील अनुभवविश्व हे लेखिकेचे विषय झालेले आहेत· तिने मोठया निखळपणे हे अनुभवविश्व पकडलेले आहे· अनुभवांना सहजसुलभ काव्यात्म भावावस्था लाभलेली आहे·

**श्रीनिवास विनायक कुलकर्णी :-**

कविप्रकृतीचे साहित्यिक, वैशिष्टयपूर्ण लेखनशैलीमुळे ललितगद्याचे दालन समृध्द करणारे एक प्रसिध्द लेखक. "डोह"(१९६५), "सोन्याचा पिंपळ"(१९७५) ही त्यांची ललित लेखनाची पुस्तके, "डोह"मधील शीर्षके पाहिली तर काव्यात्म वृत्तीचा आविष्कार दिसतो. बाळपणीच्या "मी"चे प्रतिबिंब सर्वत्र उमटलेले व ते उकलून दाखविण्याचे कार्य याच मोठया "मी"ने केलेले आहे. उदा. "फुलाची वाट". श्री. कुलकर्णींच्या ललित निबंधाने मराठी ललित गद्याच्या कक्षा निश्चितपणे रुंदावल्या.

**मधुकर केचे :-**

"आखर अंगण" (१९६७) मधील 'मी' मुक्तपणे आविष्कृत झाला आहे. "मी" ने बालपणी पाहिलेली, भोगलेली स्थळे, वस्तू, व्यक्ती, घटना हा त्यांचा विषय आहे. त्यामुळे सर्व लेखांच्यावर गतआयुष्यातील आठवणींची दाट छाया आहे. भाषा मार्मिक वाचनीय आहे.

**विजय तेंडुलकर :-**

"कोवळी उन्हे"(१९७१) महानगरी मुंबईचे सामाजिक, सांस्कृतिक जीवनाच्या विविधतापूर्ण वर्तमान वास्तव ललित गद्यकाराच्या आत्मनिष्ठेने टिपले आहे. काव्यात्मता, नाट्यपूर्णता, हळुवारपणा, वैचित्र्य, भीषणता इत्यादी विविध आशयगुणही लाभले आहेत. सहृदयता, वेधकता, माणुसकीचे स्पर्श, भाषिक कुवत, आटोपशीर चटकदार कथन हे अभिव्यक्ति विशेष तेंडुलकरांच्या लेखनाला लाभलेले आहेत. त्यामुळे ललित गद्य गतिमान, वास्तवाला भिडणारे, जीवनसापेक्ष भाष्य करणारे तरीही ललित रूप धारण करणारे आहे, याचा प्रत्यय या लेखनातून येत आहे.

**व्यंकटेश माडगूळकर :-**

"पांढ-यावर काळे" १९७१ मध्ये प्राणिजीवन कुटुंब नि "मी"च्या जीवनातील स्फुट अनुभव आलेले आहेत. माडगूळकरांच्या लेखनात प्रसन्नपणा, तटस्थता व वस्तुनिष्ठ-पणाने निवेदन आलेले आहे.

**सरोजनी वैद्य :-**

"पहाट पाणी"( १९७५) मधील सरोजनी वैद्यांचे हे लेख म्हणजे आस्वादलेल्या वाङ्‌मयकृती विषयीचे मुक्तचिंतन हे "पहाटपाणी"तील लघुनिबंधाचे आशयविश्व आहे.

**प्रभाकर पाध्ये :-**

"चिवरीची फुले" ( १९७८ ) अनुभवसमृद्ध व्यक्तिमत्त्व या लेखातून व्यक्त होताना दिसते, मात्र लघुनिबंधाची मांडणी पंचेचाळीस पूर्वकालीन आहे.

**आनंद यादव :-**

"स्पर्श कमळे"(१९७८) जीवन प्रवासातील ८ ते ५० वर्षापर्यंतच्या काळात पुरुषाच्या जीवनात स्त्री विविध शृंगाररूपात कशी येऊ शकते आणि त्या विशिष्ट टप्प्यावर त्यांचे संबंध पुरुषाच्या मनात कोणकोणत्या प्रेममार्गांनी अवतरू शकतात याचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न प्रस्तुत संग्रहात केला आहे. काव्यात्म, तरल भाषा या लेखनाला लाभली आहे. यादवांच्या ललित लेखनातून ग्रामीण अनुभवांचा आविष्कार होतो.

**अनंतराव पाटील :-**

"झडीचे दिवस" ( १९८१ ) हा स्वातंत्र्यपूर्वकालीन ग्रामजीवनाचे पारदर्शी दर्शन घडविणारा असाच लक्षणीय संग्रह आहे.

**ग्रेस :-**

१९६० नंतरचे महत्त्वाचे कवी व ललित लेखक "चर्चबेल", "मित्तवा" हे गाजलेले ललितनिबंध संग्रह. यामध्ये आठवणी आहेत, व्यक्तिचित्रणे आहेत, निसर्गाची स्पंदने आहेत. प्रतिमांचा प्रचंड वापर त्यामुळे थोडी दुर्बोधता येते नि वाचक निखळ आनंदाला मुकतो. पण "आकांताचे देणे" व "डब्ल्यू एस.लांडोरची कविता" हे निबंध उल्लेखनीय वाटतात, यातील भावकोमलता, रसिकता आणि काव्यात्मता वाचकांना आकृष्ट करते.

**मारुती चितमपल्ली :-**

"पक्षी जाय दिगंतरा", "जंगलाचं देणं" ह्या पुस्तकांमधून चितमपल्लींचे पशू आणि पक्षी यांचे सूक्ष्म निरीक्षण आढळते. शास्त्रीय माहिती आणि अनुभव ह्या

दोहोंचे अतिशय सुंदर रसायन त्यांच्या लेखनात जमलेले असते. वनाचा, वन्य प्राण्यांचा मानवी मनाला आलेला प्रत्यय हाच त्यांच्या लेखनाचा विषय असतो.

अनिल अवचट :-

"पूर्णिया", "वेध", "छेद", "हमीद", "स्वत:विषयी" , "कोंडमारा", "अमेरिका" ह्या त्यांच्या पुस्तकातून समाजाच्या वेगवेगळ्या स्तरांवरील, अनुभवांचे कथन आढळते, धार्मिक, अंधश्रध्दा, कर्मकांड, जातिभेद, शिक्षण, भ्रष्टाचार, स्त्री-पुरूषातील विषमता, हमाल, विडी कामगार स्त्रिया, देवदासी, गोंधळी असे किती तरी विषय अवचटांच्या लेखनातून आलेले आहेत. अवचटांचे लेखन एकाचवेळी वैचारिक व ललित असे दुहेरी पातळीवर जाते.

याच काळात लेखन करणारे रवींद्र पिंगे ("आनंदाच्या दाही दिशा", आनंद व्रत"), इंदिरा संत ("मृद्गंध"), वसुंधरा पटवर्धन ("मी भटकते आहे") देवीदास बागुल ("शैशवदूत", "मोहरणारी झाडे"), शिरीष पै ("आतला आवाज"), यशवंत पाठक ("ब्रह्मगिरीची सावली") यांच्या ललित गद्य लेखनाचा उल्लेख केला पाहिजे.

येथवर एक कालक्रमानुसार ललित गद्याचा आढावा घेतल्यानंतर" १९७० ते १९८० च्या दरम्यान एकूणच ललित गद्य लेखनात जीवनाचे सामाजिक अंग हळू हळू प्रभावित होत गेले, प्रसंगी लालित्य बाजूला ठेवून वेगवेगळ्या जीवनक्षेत्रातील केवळ अनुभवदर्शन घडविणे"[२२] अशा भूमिकेतून ललित लेखन झाल्याचे डॉ. आनंद यादव नमूद करतात. सामाजिकतेची जाणीव असलेल्या सामाजिक अंगाने लिखाण करणा-यात अनिल अवचटांचा समावेश होतो, अशा अवचटांच्या ललित गद्य लेखनाच्या वैशिष्टयांचा आपणाला अभ्यास करावयाचा आहे.

निष्कर्ष :-

१९६० पर्यंतच्या ललित गद्याच्या आलेखावरून लक्षात येते की, ललित गद्याच्या कलात्मक अंगावर सामान्यपणे अधिक भर आहे.

१९६०नंतर साहित्यात जीवनवाद जोरकसपणे आला. त्याचा प्रभाव सर्व वाङ्मय प्रकारावर पडला. त्यात ललित गद्यही अपवाद नाही, असे म्हणावेसे वाटते.

या प्रकरणात आपण "ललित गद्या"चे प्रयोजन, त्याची व्याख्या, विविध विचारवंतांची मते, ललित गद्याचे स्वरूप विवेचन, मराठी ललित गद्य लेखनाच्या कक्षा निबंधापासून, कालक्रम नि लेखक त्यांची वैशिष्ट्ये यासह कशा विस्तारत गेल्या याचा स्थूल स्वरूपाचा आढावा या घटकांचा विचार केला·

<u>संदर्भ टीपा</u> :-

१ कुलकर्णी भीमराव, ॥संपा॥, पारिजात, दुसरा खंड, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प·आ· १९६८ पृ· २

२ वर्तक - राणे ॥संपा॥ ललित गद्य, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, प·आ· १९९१ पृ· ४

३ अळतेकर म·मा, मराठी निबंध, सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे, प·आ· १९६३ पृ· ३१

४ वर्तक-राणे ॥संपा॥ ललित गद्य, उ·नि·पृ· ५

५ फडके ना·सी, प्रतिभा साधन, देशमुख आणि कंपनी, पुणे, द·आ· १९७० पृ· २२२

६ तत्रैव, पृ· २२०

७ खांडेकर वि·स· ॥संपा·॥ पारिजात, पहिला खंड, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, सा·आ १९६५ ॥प्रस्तावनेतून॥ पृ· १६

८ तत्रैव, ॥प्रस्तावनेतून॥ पृ· १२

९ काणेकर अनंत, पांढरी शिडे, देशमुख आणि कंपनी, पुणे १९५७ प्रास्ताविक पृ· २

१० कुलकर्णी अ·अ· ॥संपा·॥, प्रदक्षिणा, पहिला खंड, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, सा·आ· १९८० पृ· ३८१

११ भागवत-रसाळ-तेंडुलकर-कीर्तने, साहित्य : अध्यापन आणि प्रकार, पॉप्युलर प्रकाशन आणि मौज प्रकाशन, मुंबई, प·आ· १९८७ पृ· ३०३

१२ भागवत दुर्गा, पैस, मौज प्रकाशन, मुंबई, दि·आ· १९७३ पृ·७०

१३ पवार-हातकणंगलेकर ॥संपा·॥, मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप (१९५० – १९७५) पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प·आ· १९८६ पृ· २०३

१४ गाडगीळ गंगाधर, पाण्यावरची अक्षरे, सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे, प·आ· १९७९ पृ· ४,५

१५ कुलकर्णी भीमराव, ॥संपा॥ पारिजात, उ·नि· पृ· ६

१६ अळतेकर म·मा, मराठी निबंध, उ·नि· पृ·२०

१७ पवार - हातकणंगलेकर ‌§संपा·§ मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप, उ·नि·पृ· २०२

१८ कुलकर्णी अ·अ·§संपा·§, प्रदक्षिणा, पहिला खंड, उ·नि·पृ·२०१

१९ पवार-हातकणंगलेकर, §संपा·§ मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप, उ·नि·पृ· २०२

२० कुलकर्णी भीमराव §संपा·§ पारिजात, §प्रस्तावना§ उ·नि·पृ· ३

२१ पवार-हातकणंगलेकर, §संपा·§, मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप, उ·नि·पृ· २०३

२२ कुलकर्णी अ·अ· §संपा·§, प्रदक्षिणा, दुसरा खंड, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प·आ· १९९१ पृ· २६७